**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ , अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त द्वितीय अपिल**

**अपिल क्र.१४१८/२०११**
जा.क्र.
दिनांक -

अर्जदार तथा अपिलकर्ता
श्री प्रभाकर गोपाळराव सबनीस
विवेकानंद कॅालनी, अमरावती

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.)
जिल्हा परिषद, अमरावती

२. जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी (पंचायत विभाग)
जिल्हा परिषद, अमरावती

**(आदेश पारीत दिनांक ०५/०१/२०१२)**

**- निर्णय -**

अर्जदार तथा अपिलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत.

अर्जदार तथा अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये जोडपत्र-अ नुसार दि. १७/२/११ रोजी अधिक्षक/कक्ष अधिकारी, पंचायत विभाग, जि.प. अमरावती यांचेकडे अर्ज करुन माहिती मागितली होती. अर्जदाराने या आयोगाकडे दि.२/६/११ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची आज सुनावणी घेण्यात आली तेंव्हा मुद्दा क्र.२ ची माहिती मिळाली नाही असे अर्जदाराने सांगितले.

सुनावणीनंतर १२.३० वाजता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) जि.प. अमरावती तर्फे श्री एस.आर.मेश्राम, वरिष्ठ सहाय्यक तसेच श्री ए.के.फुके, ग्रा.वि.अ. जिल्हा परिषद (पंचायत) अमरावती हजर झालेत. उप मु.का.अ. अमरावती तसेच जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक (पंचायत) जि.प. अमरावती यांचा लेखी खुलासा आयोगाकडे सादर केला. सदर दोन्ही लेखी खुलाशाच्या झेरॅाक्स प्रती व अर्जदाराच्या जोडपत्र-अ मधील मुद्दा क्र.२ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला आठ दिवसामध्ये रजिष्टर पोष्टाने विनाशुल्क पाठवुन तसा अहवाल या आयोगास पाठविण्यासंबंधी आदेशीत करण्यात येत आहे. उत्तरवादी तर्फे आयोगासमोर हजर झालेले प्रतिनिधी श्री मेश्राम व श्री फुके यांना तसे अवगत करण्यात आले व त्यांनी तसे आयोगासमोर कबुल केले. सदर कारणावरुन अर्जदाराचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

जिसकार/